# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0026 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/01/2025 13:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Date From (दिनांक पासून):** 10/10/2023
**Time Period (कालावधी):** पहर 6
**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/10/2023
**Time From (वेळेपासून):** 17:01 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/01/2025 **Time (वेळ):** 13:39 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 028
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/01/2025 13:39 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** स्टेशन रोड,शाहुपूरी कोल्हापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** दीपक मोहनदास अरोरा

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** मोहनदास अरोरा

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1952

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं70 ए वर्ड,राजोपाध्येनगर, ,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं70 ए वर्ड,राजोपाध्येनगर, ,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र, भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9922770618

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरूण अपराध | | | 1. कपिलतिर्थ मार्केटजवळ कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 09/01/2025

मी दीपक मोहनदास अरोरा वय 73 वर्षे व्यवसाय सेवानिवृत्त रा.प्लॉट नं.70 ए वॉर्ड, राजोपाध्येनगर, कोल्हापूर मो नं 9922770618 आज अँन्टी करप्शनु ब्युरो,कोल्हापूर समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी व माझा मुलगा गौरव असे दिनांक 26/09/2023 रोजी अँन्टी करप्शन कार्यालय कोल्हापूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री.सरदार नाळे यांचे कार्यालयात येवुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, माझी व पुतण्या तुषार अरूण अरोरा (सध्या रा.दुबई )याची वडीलोपार्जित मिळकत 342 ई वॉर्ड, रेल्वे स्टेशन समोर,कोल्हापूर येथे आहे.सदर ठिकाणी मी व पुतण्या तुषार दोघांनी जुनी इमारत पाडून नविन इमारत बांधण्याकरीता गेले दोन वर्षापुर्वीपासून सुरूवात केली आहे.आम्ही नवीन इमारतीचे ठिकाणी वीज जोडणीकरीता मी स्वतः एमएसईबी कार्यालय, नागाळा पार्क कोल्हापूर येथे आमचे इलेक्ट्रीक कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांचे तर्फे अर्ज दिला होता.सदरचा अर्ज दिलेनंतर एमएसईबी कार्यालयाकडील अधिकारी इंजिनिअर शेख, चौगुले व माने असे आमचे साईटवर पाहणीकरीता आले त्यावेळी त्यांनी आमचे साईटवर नविन ट्रान्स्फार्मर बसवावा लागेल व तसे नको असलेस अस्तीत्वात असणा-या ट्रान्स्फार्मरवरील लोड वाढवून अपग्रेड करून तुम्हाला जोडणी द्यावी लागेल व सर्व खर्च तुम्हालाच करावा लागेल असे सांगितले.त्यानंतर काही दिवसांनी आमचे इलेक्ट्रीक कॉन्ट्रक्टर अरूण अपराध यांना एमएसईबीचे इंजिनिअर माने यांनी बोलावून आमचे नविन इमारतीचे साईटवर वीज जोडणी करून देण्याकरीता तीन ते साडेतीन लाख रूपये द्यावे लागतील असे अपराध यांचे मार्फत मला व मुलगा गौरव यास कळविले होते. त्यावेळी एमएसईबीचे अधिकारी माने साहेब हे लाचेची मागणी करत असलेबाबत खात्री झालेने त्यांचेवर कारवाई व्हावी म्हणुन अर्ज दिला. तसेच आज रोजी मी त्यांना भेटणेस जाणार आहे असे सांगितले त्यावेळी नाळे साहेबांनी मी दिले अर्जावर कारवाईसाठी विभागीय सह निबंधक कार्यालय कोल्हापूर कार्यालयाकडुन दोन षासकिय पंचांना बोलावुन घेतले होते. तसेच त्यांचे कार्यातयातील सापळा पथकासाठी अमंलदार बोलावुन घेतले त्यानंतर त्यांचेषी तसेच पंचांषी माझी तसेच मुलगा गौरव याची ओळख करुन देवुन, मला माझी तक्रारी पंचांना सांगणेस सांगितली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी अर्जावर नाळे साहेब तसेच दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर पुढील कारवाई सर्किट हाउस कोल्हापूर येथे करण्याचे आहे असे सांगितले नंतर आम्ही सर्वजण तेथे पोहचलो. त्यावेळी नाळे साहेबांनी तेथे कारवाईचे अनुषगाने त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन एमएसईबी अभियंता माने यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 कोगनोळे व मुलगा गौरव असे माझे कारमधुन अभियंता माने यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. मी व मुलगा एमएसईबी अभियंता माने यांना भेटलो त्यावेळी आमचेत आमचे बिल्डींग मध्ये बसविणेत येणारा ट्रान्सफर याचे अनुषंगाने बोलने झाले तसेच त्याबाबत आवश्यक असलेली कागदपत्रे उदया कार्यालयात घेवून भेटा असे मुलगा गौरव याला सांगितले. त्यानंतर तेथुन येवुन आम्ही नाळे साहेबांना सर्व हकीकत सांगितली. अभियंता माने यांनी गौरव याला उदया कागदपत्रे घेवुन येणेस सांगितलेने चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 27/09/2024 रोजी माझी तब्येत बरी नसल्याने तसेच अभियंता माने यांनी मुलगा गौरव याला कागदपत्रे घेवुन बोलाविले असल्याने मुलगा गौरव हा नाळे साहेबांना जावुन भेटला त्यावेळी नाळे साहेबांनी ब्युरोकडील कार्यप्रणालीप्रमाणे मुलगा गौरव व पंच नं.1 यांना अभियंता माने यांना भेटण्यास पाठविले त्यावेळी मुलगा गौरव व एमएसईबी अभियंता माने यांची समक्ष भेट होवुन एमएसईबी अभियंता माने यांनी मुलगा गौरव याला कार्पोरेशनची डीमोलेशनची ऑर्डर काय आहे ती पहावी लागेल त्यानंतर पुढील स्ट्रॅटेजी ठरवू असे सांगीतलेचे पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झालेचे तसेच एमएसईबी अभियंता माने यांनी मुलगा गौरव यांना संपर्क केल्यानंतर

पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरवले असल्याचे सांगुन चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली असल्याचे गौरव याने मला सांगितले.
दिनांक 10/10/2023 रोजी मुलगा गौरव याला एमएसईबी अभियंता माने यांनी भेटण्यास बोलाविले असलेने तो नाळे साहेबांना जावुन भेटला त्यावेळी नाळे साहेबांनी ब्युरोकडील कार्यप्रणालीप्रमाणे मुलगा गौरव व पंच नं.1 यांना अभियंता माने यांना भेटण्यास पाठविले त्यावेळी तेथे माने साहेब व मुलगा गौरव यांचेमध्ये एमएसईबी कार्यालयामध्ये आमचे कामासंबधाने चर्चा झाली व त्यावेळी माने साहेबांनी मुलगा गौरव यास महापालीकेतून जागेबाबतची एनओसी प्राप्त करून घ्या, महापालीकेचा काय रिप्लाय येतो ते बघू असे म्हणाले. त्यानंतर मुलगा गौरव याने एमएसईबीचे चौगुले यांना फोन केला. त्यावेळी त्यांनी एनओसी आणणार आहे ना त्यापध्दतीने इस्टीमेंट फॉरवर्ड केलेलं आहे असे सांगितले. त्यादिवशी इंजिनिअर माने यांनी मुलगा गौरव यांचेकडे आमचे काम करून देण्याकरीता लाचेची मागणी केली नाही किंवा आमचे कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांचेकरवी कळविलेल्या तीन ते साडेतीन लाख रूपयांबाबतही दुजोरा दिला नाही.

त्यामुळे नाळे साहेबांनी मुलगा गौरव यास कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांचेकडे पडताळणी करीता अपराध यांचे स्टेशन रोड,शाहुपूरी कोल्हापूर येथे भेट घेण्यास मला पंचासह पाठविले. त्यावेळी मुलगा गौरव व कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांचेमध्ये आमचे बिल्डींगचे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली. कॉन्ट्रॅक्टर अपराध यांनी आमचे बिल्डींगचे जागेत नविन ट्रान्स्फारर्मर न बसविता अस्तित्वात असलेल्या दुस-या ट्रान्स्फार्मरवरून लोड वाढवून विद्युत जोडणी देणेसाठी एमएसईबीचे इंजिनिअर माने साहेबांकरीता 3,50,000/- रू.लाचेची मागणी केली आहे. तसेच लाचेची रक्कम अरूण अपराध यांचेकडे दया असे म्हणुन अपराध यांचे सोबत असलेल्या इसमाने लाच देणेसाठी प्रोत्साहन दिले आहे. तसेच महानगरपालिकेची एनओसी मिळालेनंतर पुढील कारवाई करण्याचे ठरवले असल्याचे सांगुन चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली असल्याचे गौरव याने मला सांगितले.

दिनांक 12/01/2024 रोजी मी व मुलगा गौरव अरोरा असे एसीबी कार्यालयात येवुन नाळे साहेबांना भेटुन आम्हाला एमएसईबी कडून आमचे ट्रान्सफॉर्मरचे काम करून घेणेबाबतचे पत्र प्राप्त झाले असल्याने मुलगा गौरव हा एमएसईबी अभियंता माने यांची आज दि.12/01/2024 रोजी भेट घेण्यास जाणार आहे त्यावेळी ते त्याचेकडे लाचेची मागणी करतील असे सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच व त्यांचा स्टाफ बोलावुन घेतले त्यावेळी नाळे साहेबांनी ब्युरोकडील कार्यप्रणालीप्रमाणे मुलगा गौरव व पंच नं.1 यांना अभियंता माने यांना भेटण्यास पाठविले त्यावेळी मुलगा गौरव हा माने साहेब यांना जावुन भेटलो. त्यावेळी त्यांचेत आमचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी एमएसईबी अभियंता माने यांनी मुलगा गौरव याला महानरपालिकेतून पत्र घ्या व चौगले ना भेटा असे सांगीतलेचे पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.एमएसईबी अभियंता माने यांनी मुलगा गौरव याला महानगरपालिकेतून पत्र घ्या व चौगले ना भेटा असे सांगितले असल्याने एमएसईबी अभियंता चौगले यांची मुलगा गौरव भेट घेण्यास जाणार त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यावेळी नाळे साहेबांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 19/01/2024 रोजी मी व मुलगा गौरव अरोरा असे एसीबी कार्यालयात येवुन नाळे साहेबांना भेटुन आम्हाला एमएसईबी अभियंता चौगले यांनी मुलगा गौरव यांना भेटण्यास बोलाविले असल्याने अभियंता चौगले यांची आज दि.19/01/2024 रोजी भेट घेण्यास जाणार आहे त्यावेळी ते माझेकडे लाचेची मागणी करतील सांगीतले. त्यावेळी नाळे साहेबांनी पंच व त्यांचा स्टाफ बोलावुन घेतले त्यावेळी नाळे साहेबांनी ब्युरोकडील कार्यप्रणालीप्रमाणे मुलगा गौरव व पंच नं.1 यांना अभियंता माने यांना भेटण्यास पाठविले त्यावेळी एमएसईबी अभियंता चौगले व कांबळे हे कार्यालयात नसलेमुळे मुलगा गौरव याने त्यांचेशी फोनवर बोलणे केले त्यावेळी त्यांनी गौरव याला एमएसईबीच्या स्कीमधून ट्रान्सफॉर्मरचे काम करून घेणेबाबत सांगीतले व तसे त्याला पुन्हा कधीही भेटायला येण्यास सांगितले. त्यानंतर मुलगा गौरव याने परत येवुन घडलेली हकीकत नाळे साहेबांना सांगितली. अभियंता चौगले व कांबळे यांची भेट घेण्यास मुलगा गौरव ज्यावेळी जातील त्यावेळी पुढील पडताळणी कारवाई करण्याचे ठरले. त्यावेळी नाळे साहेबांनी चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

त्यानंतर आमचे कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांनी सात आठ महिन्यापुर्वी आमचेशी संपर्क करून त्यांनी आमचे वीज जोडणीचे घेतलेले काम सोडून दिलेबाबत सांगितले. त्यानंतर आम्हाला एमएसईबी कार्यालयातून कोणाचाही फोन आला नाही. कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांनी आमचे काम सोडून दिलेने मुलगा गौरव याने दुसरे कॉन्ट्रॅक्टर सुनिल साखळकर यांचेकडे मार्च 2024 मध्ये कॉन्ट्रॅक्ट दिले होते व त्यांनी आमचे काम सुरू केले असून आमचे काम पुर्ण होत आलेले आहे. मे 2024 मध्ये मुलगा गौरव हा आर्यलॅन्ड येथे परदेशी गेला आहे.दरम्यान मुदतीत अँन्टी करप्शन कार्यालयाकडून मला मी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने वेळोवेळी फोन तसेच संपर्क करीत होते. परंतु

मी वयस्कर असलेमुळे व माझी तब्बेत वरचेवर बरी नसल्यामुळे मी त्यांना माझी तब्येत ठिक झालेनंतर कार्यालयात येत असलेबाबत कळवित होतो. दरम्यान जानेवारी 2024 पासुन मला कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध अथवा एमएसईबीचे अभियंता माने साहेब अगर त्यांचेवतीने इतर कोणी माझेकडे तसेच गौरव याचेकडे प्रत्यक्ष पैशाची मागणी केलेली नाही.

कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांनी आमचे वीज जोडणीचे काम सोडले असलेमुळे त्यांनी यापुर्वीच्या पडताळणी वेळी मुलगा गौरव यांचेकडे बिल्डींगचे कामाचे अनुषंगाने चर्चा केली त्यावेळी कॉन्ट्रॅक्टर अपराध यांनी आमचे बिल्डींगचे जागेत नविन ट्रान्स्फारर्मर न बसविता अस्तित्वात असलेल्या दुस-या ट्रान्स्फार्मरवरून लोड वाढवून विद्युत जोडणी देणेसाठी एमएसईबीचे इंजिनिअर माने साहेबांकरीता 3,50,000 रू.लाचेची मागणी केली होती. परंतु कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांनी आमचे वीज जोडणीचे काम सोडले असलेमुळे त्यांनी यापुर्वी आमचेकडे एमएसईबीचे इंजिनिअर माने साहेबांकरीता मागणी केलेले पैसे ते आता घेणार नाहीत याची मला खात्री झाली आहे.

तरी कॉन्ट्रॅक्टर अरूण अपराध यांनी आमचे कोल्हापूर येथील नविन इमारतीचे ठिकाणी विज जोडणीकरीता बिल्डींगचे जागेत नविन ट्रान्स्फारर्मर न बसविता अस्तित्वात असलेल्या दुस-या ट्रान्स्फार्मरवरून लोड वाढवून विद्युत जोडणी देणेसाठी एमएसईबीचे इंजिनिअर माने साहेब यांचे नाव सांगुन त्याचेकडुन काम करून देतो असे सांगुन आमचेकडे 3,50,000/- रू. दयावे लागतील असे म्हणुन बेकायदेशिरपणे आमचेकडे लाचेची मागणी केली आहे म्हणून अरूण अपराध, रा. कपिलतिर्थ मार्केट जवळ कोल्हापूर याचेविरूध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

**or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव)**:**
SANJIV ANNU BAMBARGEKAR
**Rank (पद):** SI (Sub-Inspector) **No.(क्र.):**
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**:**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार

**Signature of Officer incharge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): santosh gundopant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): SGDM7903